**CNR NO-MHSO060014542021**

**नियमित दिवाणी दावा क्र. ९१/२०२१**

वसंत घुले
वि.
महाराष्ट्र सरकार व इतर.

**नि. क्र.७६ वरील आदेश**
**(घोषित दि. ०२/१२/२०२२)**

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आलेला असून ति–हाईत इसमातर्फे दाखल अर्ज नि.क्र. ७३ वर झालेला 'विना म्हणणे' चा आदेश रद्द करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] ति–हाईत इसमातर्फे सदर अर्जास प्रखर विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] ति–हाईत इसम यांनी प्रस्तुत दाव्यात त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करुन घेण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे नि.क्र. ७३ वर अर्ज सादर केला. वादीने सदर अर्जावर आपले म्हणणे सादर न केल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज 'विना म्हणणे' चालविण्याबाबत दि.१९/११/२०२२ रोजी आदेश पारीत करण्यात आला. सदरचा आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता प्रस्तुत अर्ज सादर करुन वादीने असे नमूद केले की, दि.१९/११/२०२२ रोजी वादी व त्यांचे विधिज्ञ परगावी असल्यामुळे नि.क्र. ७३ वर म्हणणे सादर करु शकलेले नाहीत. नि.क्र. ७३ चा अर्ज लक्षात घेता वादीचे म्हणणे पटलावर असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता तथा न्यायदानाच्यादृष्टीने वादीला आपले म्हणणे सादर करण्याची परवानगी देणे न्यायोचित असल्याचे माझे मत झाले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. ७३ वादीविरुध्द 'विना म्हणणे ' चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो व वादीतर्फे दाखल करण्यात आलेले म्हणणे स्वीकारण्यात येते.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.12.02 17:20:39 +0530

**दि.०२/१२/२०२२.**

**(अमित अ.खंडाळे)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपुर.**
**<u>J.O.CODE-1828</u>**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 02.12.2022 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 02.12.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 02.12.2022 |